# वसई विरार शहर महानगरपालिका

## मुख्यालय विरार

### कलम ४ (१) ब १

### नगररचना विभाग

१. विभागातील कार्ये व कर्तव्ये यांचा तपशिल

१. कार्यालयाचे नांव :- नगररचना विभाग

२. पत्ता :- तिसरा मजला, मुख्यालय इमारत,
वसई विरार शहर महानगरपालिका.

३. कार्यालय प्रमुख :- श्री. वाय.एस.रेड्डी उपसंचालक

४. विभागाचे ध्येय व धोरण :-
१. महानगरपालिकेतील नगररचना विभागाचे प्रमुख म्हणुन काम पहाणे व महानगरपालिका आयुक्त यांना थेट अहवाल सादर करणे.
२. विकास योजनेची अंमलबजावणी करणे.
३. विकास नियंत्रण नियमावलीची अंमलबजावणी करणे.
४. अनधिकृत बांधकामाच्या प्रकरणांत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२, ५३, ५४ व ५५ च्या अनुशंगाने सल्ला व मार्गदर्शन देणे.

५. कामाचे विस्तृत स्वरुप :-

| अ.क्र. | कामाचे स्वरुप |
|---|---|
| १ | महानगरपालिकेतील नगररचना विभागाचे प्रमुख म्हणुन कामकाज पहाणे व महानगरपालिका आयुक्त यांना थेट अहवाल सादर करणे. |
| २ | विकास योजनेची अंमलबजावणी :<br>अ) विकास योजना अंमलबजावणीसाठी प्राथम्य यादी तयार करुन त्यानुसार अंमलबजावणीसाठी आवश्यक ते तांत्रिक सहकार्य करणे.<br>ब) केंद्र शासन पुरस्कृत व राज्य शासनाच्या विविध योजनांखाली अर्थसहाय्य मिळविण्यासाठी प्रस्ताव तयार करणे व त्या अनुशंगाने शासनास वेळोवेळी पत्रव्यवहार करणे.<br>क) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम/भूसंपादन अधिनियमांतर्गत विकास योजनेच्या प्रस्तावाखाली जमिनीच्या भूसंपादनांसाठी आवश्यक ती कार्यवाही करणे, जमिनीच्या मुल्यांकनाचा प्राथमिक अहवाल तयार करणे. |

| | |
|---|---|
| | ड) विकास योजनेबाबत आवश्यकतेनुसार फेरबदलाचे प्रस्ताव तयार करणे.<br>ई) महानगरपालिकेला नगररचना विषयाशी संबंधित प्रकरणांत तांत्रिक सल्ला देणे.<br>फ) विकास योजनेच्या अंमलबजावणीबाबतची सर्व प्रकरणे हाताळणे. |
| ३ | विकास नियंत्रण:<br>महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४४ अंतर्गत प्राप्त विविध बांधकाम परवानगी, विकास परवानगी, अभिन्यास मंजूरीच्या प्रकरणांची छाननी करणे. आयुक्त, म.न.पा यांच्या मंजुरीने प्रारंभ प्रमाणपत्र, बांधकाम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र, भोगवटा प्रमाणपत्र इ. अनुषंगिक कामाबाबत कार्यवाही करणे. |
| ४ | महानगरपालिकेतील प्रभाग अधिका-यांना व इतर संबंधितांना अनधिकृत बांधकामाच्या प्रकरणात महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाच्या कलम ५२, ५३, ५४ व ५५ च्या अनुशंगाने सल्ला व मार्गदर्शन देणे. |

६. रचना :-

